# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
Date – 03 October 2023
Time 18.10 to 18.20
Language Marathi
**आकाशवाणी औरंगाबाद**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – ०३ ऑक्टोबर २०२३ सायंकाळी ६.१०**

****

- दिवाळीनिमित्त आनंदाच्या शिध्यात पोहे आणि मैद्याचा समावेश करण्यास मंत्रिमंडळाची मंजूरी
- नुकसान झालेल्या सोयाबीन पिकांचे पंचनामे सुरू करण्याचे कृषी विभागाला निर्देश
- नांदेडच्या शासकीय रुग्णालयातील मृत्यू प्रकरणी दोषींवर कारवाईची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

आणि

- आशियायी क्रीडा स्पर्धेत पाच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत भारताच्या पारुल चौधरीला सुवर्णपदक

****

दिवाळीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना शंभर रुपयात आनंदाचा शिधा देण्याच्या निर्णयाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या आनंदाच्या शिध्यामध्ये मैदा आणि पोहे या दोन घटकांचा समावेश करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली. आता या शिध्यामध्ये एक किलो साखर, एक लिटर खाद्यतेल तसेच प्रत्येकी अर्धा किलो रवा, चनाडाळ, मैदा आणि पोहे असा शिधा राहील. हा आनंदाचा शिधा २५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर पर्यंत वितरित करण्यात येईल. यासाठी येणाऱ्या एकूण ५३० कोटी १९ लाख इतक्या खर्चाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

कृषी पंप वीज जोडण्या वेगाने पूर्ण करण्यासाठी उच्च दाब वितरण प्रणालीला ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या योजनेतून विदर्भ, मराठवाड्यातील प्रलंबित कृषी पंप वीज जोडण्या पूर्ण करण्यात येईल. या योजनेच्या चार हजार ७३४ कोटी ६१ लाख रुपये सुधारित खर्चालाही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

अल्पसंख्याक समाजातल्या विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षणाकरता शिष्यवृत्ती योजना राबवण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. दरवर्षी २७ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेसाठी १० कोटी ८० लाख रुपये खर्चास देखील आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

इमारतींच्या पुनर्विकास प्रक्रियेला वेग देण्यासाठी संबंधित अधिनियमात सुधारणा करण्यालाही मंत्रिमंडळाने आजच्या बैठकीत मान्यता दिली. यानुसार पुनर्विकासाला विरोध करणारे रहिवासी किंवा सभासदांविरुद्ध निष्कासनाची कार्यवाही करण्याकरता अधिनियमात स्वयंस्पष्ट तरतूद करण्यात येणार आहे.

****

राज्यात नुकसान झालेल्या सोयाबीन पिकांचे पंचनामे सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीत दिले. राज्यात लातूर-नांदेडसह नऊ जिल्ह्यांमध्ये सोयाबीनवर पिवळा मोझॅक तसंच खोडकूज, मूळकूज या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. प्रारंभी पावसाचा मोठा खंड आणि सप्टेंबरमध्ये झालेला पाऊस, तापमानात बदल तसेच इतर काही कारणांमुळे हा प्रादुर्भाव झाला असून, सोयाबीनचे पीक पिवळे पडत आहे. नुकसान झालेल्या क्षेत्रामध्ये विमा संरक्षित क्षेत्राचा अंतर्भाव असल्यामुळे विम्याची मदत वेळेत करणं शक्य व्हावं, यासाठी कृषी विभाग तसंच मदत आणि पुनर्वसन विभागांनी संयुक्तपणे प्राधान्यानं हे पंचनामे करावेत असे निर्देश देण्यात आले.

****

डॉ.आंबेडकर लेखन आणि भाषणे या ग्रंथांचे विविध खंड तसंच अनुवादाचं आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आलं.

****

नांदेड इथल्या शासकीय रुग्णालयात रुग्णांचे मृत्यू ही बाब सरकारने गांभीर्याने घेतली असून, या घटनेची चौकशी केली जाईल तसंच दोषींवर कारवाई केली जाईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे.

***नांदेड झालेली घटना, झालेले मृत्यू याची चौकशी होईल आणि चौकशीअंती कुणाचा दोष असेल तर नक्की त्याच्यावर कारवाई केली जाईल. परंतू सरकारने ही बाब अतिशय गांभीर्याने घेतलेली आहे.***

****

नांदेड इथल्या डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात २४ रुग्णांचा मृत्यू झाल्याप्रकरणी विरोधकांनी सरकारला जबाबदार धरलं आहे. या रुग्णालयात कालपासून आणखी सात रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली असून, औषधांच्या तुटवड्यामुळे हे मृत्यू होत असल्याचं विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर शहरातल्या घाटी रुग्णालयामध्ये कालपासून २४ तासांत दोन नवजात बालकांसह १० जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही या मुद्यावरुन सरकारवर टीका केली.

दरम्यान, शासकीय रुग्णालयात येणारे बहुतांशी रुग्ण हे मरणासन्न अवस्थेत असतात, त्यामुळे डॉक्टरांनी प्रयत्न करूनही बरेचदा रुग्णाचा मृत्यू होत असल्याचं, छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय – घाटीचे अधिष्ठाता डॉ संजय राठोड यांनी सांगितलं. घाटी रुग्णालयात उपचारादरम्यान रुग्ण दगावल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. औषधांच्या अभावाने रुग्ण दगावत असल्याचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. ते म्हणाले –

***मृत्यू हा अटळ आहे. आणि आमचं दुर्दैवं की आमच्याकडे जो पेशंट येतो, हा टर्मिनस स्टेजेस्‌ला येतो. आणि त्यावेळेस आम्ही आमचे प्रयत्न करतो. तरी पण ह्या घटना घडतात. औषधाच्या बाबतीमध्ये***

***कुठलीही तक्रार नाही. जिथे जिथे अशा सिरीयस पेशंटस्ची ट्रीटमेंट होते, तिथे आम्ही औषधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. आमच्याकडून औषधी उपलब्ध करून दिल्या जातात. नाहीतर आम्ही लोकल पर्चेसमधून देतो. ते ही नाही झालं आम्ही नातेवाईकांना पण सांगतो की नाहीये हे. ते ही जरी नसेल आमच्याकडे दहा – पंधरा एन जी ओ अशा व्हॉलिंटरीली रेजिस्टर्ड केलेल्या आहेत, त्यांच्याकडून आम्ही उपलब्ध करून घेतो.***

✻✻✻✻

राज्यभरातील सुमारे दोन हजार ३५९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी येत्या पाच नोव्हेंबरला मतदान घेण्यात येणार आहे. ग्रामपंचायतींमधल्या दोन हजार ९५० सदस्यपदाच्या; तर १३० सरपंचांच्या रिक्तपदांच्या पोटनिवणुकांसाठी याच दिवशी मतदान होणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

✻✻✻✻

थोर स्वातंत्र्यसेनानी व मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त विधानभवन परिसरातील त्यांच्या पुतळ्यास विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

छत्रपती संभाजीनगर इथं स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेतही स्वामीजींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथं क्रांती चौकातल्या स्वातंत्र्यसंग्राम स्मारकात नियोजित जागेवर स्वामीजींचा पुतळा बसवण्याचं काम येत्या जानेवारी महिन्यापर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती संस्थेचे सचिव सारंग टाकळकर यांनी दिली.

✻✻✻✻

आशियायी क्रीडा स्पर्धेत भारताने आज सायंकाळपर्यंत एक सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्य पदकांची कमाई केली. महिलांच्या पाच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत पारुल चौधरीने सुवर्णपदक जिंकलं. तिने पंधरा मिनिट आणि चौदा पूर्णांक ७५ सेकंदात हे अंतर पूर्ण केलं. पुरूषांच्या आठशे मीटर धावण्याच्या स्पर्धेत मोहमद अफजलनं रौप्य तर महिलांच्या चारशे मीटर अडथळ्यांच्या स्पर्धेत विद्यानं कांस्य पदक पटकावलं.

दुहेरी नौकानयनात अर्जुनसिंह आणि सुनीलसिंह यांनी कांस्यपदक जिंकलं. एकूणच आशियायी स्पर्धेत नौकायनातलं भारताचं हे दुसरं पदक आहे. महिलांच्या मुष्टियुद्ध प्रकारात प्रिती पवारने ५४ किलो वजन गटात कांस्यपदक पटकावलं. तर याच स्पर्धेत लवलीना बोरगोहाईनने ७५ किलो वजन गटात अंतिम फेरीत धडक मारली आहे. या दोघांनी पॅरीस ऑलिम्पिकसाठी पात्रता ही प्राप्त केली आहे.

****

हिंगोली जिल्ह्याच्या कळमनुरी तालुक्यात कोंढुर, डिग्रस इथं कयाधू नदीवर पूल बांधण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी आज कयाधू नदीच्या पात्रात उतरून आंदोलन केलं. पोलीस प्रशासनाने आंदोलकांना नदी पात्रातून बाहेर काढल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे

****

राज्यात आरक्षणावरुन वादंग पेटलेलं असताना, समाजा समाजात क्लेश निर्माण होत असताना राज्य सरकारची भूमिका बेजबाबदारपणाची असल्याचा आरोप डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंचाचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी केला आहे. विकास मंचच्या वतीने आज बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला, त्यावेळी ते बोलत होते. कंत्राटीकरण तसंच कथित खाजगीकरणाच्या विरोधात हा मोर्चा काढण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं विभागीय स्तरावरील महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी येत्या ९ ऑक्टोबर रोजी लोकशाही दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ११ वाजता याअंतर्गत दाखल प्रकरणांची सुनावणी होईल. त्यानंतर याच ठिकाणी महिला लोकशाही दिनाचं आयोजन करण्यात येणार असल्याचं, विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळवलं आहे.

****

नाशिक जिल्ह्यात १४ दिवसांनंतर कांद्याचा लिलाव सुरु झाला. लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत आज सकाळी कांद्याला प्रतिक्विंटल सरासरी दोन हजार रूपये भाव मिळाला. अन्य बाजार समित्यांमध्ये देखील सर्व व्यवहार सुरळीत झाला. केंद्र शासनानं कांद्यावरचं निर्यात शुल्क रद्द करावं यासह विविध मागण्यांसाठी २० सप्टेंबरपासून कांदा व्यापारी संपावर होते.

****

क्रिकेट विश्वचषक स्पर्धेपूर्वीचा भारताचा आजचा नियोजित सराव सामनाही पावसामुळे होऊ शकला नाही. तिरुवअनंतपुरम् इथं नेदरलँड्स सोबत होणारा हा सामना पावसामुळे रद्द करावा लागला.

****